पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
विद्या परिषदेच्या ४१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
शनिवार, दि.०६ जून, २०२० दुपारी १२:०० वा.

NAAC Accredited-2015
'B' Grade (CGPA-2.62)

विद्या परिषदेची ४१ वी बैठक शनिवार, दि.०६ जून, २०२० रोजी दुपारी १२:०० वा. विद्यापीठ सभागृहामध्ये मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरंन्सने आयोजित करण्यात आली होती.

Google Meet Application द्वारे व्हिडीओ कॉन्फरंन्सने सहभाग घेतलेले सदस्य खालीलमाणे:

अ.क्र.	सदस्याचे नांव	पद
१)	डॉ. मृणालिनी फडणवीस - मा. कुलगुरु	अध्यक्ष
२)	डॉ. डी. एन. मिश्रा - प्र-कुलगुरु	सदस्य
३)	प्राचार्य डॉ. व्ही. पी. उबाळे - प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा	सदस्य
४)	प्राचार्य डॉ. एस. एस. गोरे - प्रभारी अधिष्ठाता, आंतर - विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा	सदस्य
५)	डॉ. एस. आर. गेंगजे - प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा	सदस्य
६)	डॉ. ए. एन. बारबोले, प्रभारी सहयोगी अधिष्ठाता वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा	सदस्य
७)	डॉ. व्ही. एल. कदम - अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा	सदस्य
८)	प्राचार्य डॉ. एम. कृष्णमूर्ती - प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा	सदस्य
९)	प्राचार्य डॉ. एस. एस. गणापूर, प्रभारी सहयोगी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा	सदस्य
१०)	प्राचार्य डॉ. एम. एम. दलाल	सदस्य
११)	डॉ. बी. पी. रोंगे	सदस्य
१२)	प्राचार्य डॉ. पी. आर. थोरात	सदस्य
१३)	डॉ. ए. एच. ननवरे	सदस्य
१४)	डॉ. एन. जी. शिंदे	सदस्य
१५)	डॉ. टी. एन. कोळेकर	सदस्य
१६)	डॉ. श्रीमती एस. आय. शेख	सदस्या
१७)	डॉ. व्ही. पी. शिखरे	सदस्य
१८)	श्री. पी. टी. पाटील	सदस्य
१९)	डॉ. कोथुर राघवेंदर राव	सदस्य
२०)	श्री. एस. एच. शहा - प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ	सदस्य

२१)	प्राचार्य डॉ. एम. एस. कदम	सदस्य
२२)	डॉ. टी. एन. लोखंडे	सदस्य
२३)	प्राचार्य डॉ. एस. ए. हलकुडे	सदस्य
२४)	डॉ. डी. आर. गायकवाड	सदस्य
२५)	डॉ. श्रीमती ॲनी जॉन	सदस्या
२६)	डॉ. सी. एस. चव्हाण	सदस्य
२७)	डॉ. बी. एच. दामजी	सदस्य
२८)	प्रा. डॉ. व्ही. बी. घुटे – कुलसचिव	सदस्य सचिव

: निमंत्रित :

अ.क्र.	निमंत्रितांचे नाव
१)	डॉ. एस. एन. सलवदे
२)	श्रीमती ए. ए. सुलाखे
३)	श्री. बी. एस. शिवशरण
४)	डॉ. जी. एस. कांबळे
५)	डॉ. एम. पी. शास्त्री
६)	डॉ. श्रीमती एम. जे. पाटील
७)	डॉ. ए. ए. गढवाल
८)	प्राचार्य डॉ. ए. एल. देशमुख
९)	डॉ. आर. बी. चिंचोलकर
१०)	डॉ. श्रीमती एन. सी. वाघमारे
११)	डॉ. एल. बी. दामा
१२)	डॉ. व्ही. बी. पाटील
१३)	डॉ. व्ही. एम. दीक्षीत

स्वागत:

मा. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

तसेच डॉ. डी. बी. मिश्रा, प्र-कुलगुरु यांची विद्या परिषदेची ही पहिलीच बैठक असल्याने मा. कुलसचिव यांनी विद्या परिषदेच्या वतीने त्यांचे स्वागत केले.

सदर बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

[०१] दि.२६ नोव्हेंबर, २०१९ रोजी झालेल्या विद्या परिषदेच्या ४० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव:	दि.२६ नोव्हेंबर, २०१९ रोजी झालेल्या विद्या परिषदेच्या ४० व्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून सर्वानुमते कायम करण्यात आला.

[०२] **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता विद्यापीठातील सर्व संकुल व संलग्नित सर्व महाविद्यालयाकरिता सत्र आरंभ व समाप्तीच्या तारखांना व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्याची बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदय यांनी दिलेली मान्यता माहितीस्तव.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाकडील सर्व संकुल व संलग्नित सर्व महाविद्यालयाकरीता सत्र आरंभ व समाप्तीच्या तारखा निश्चित करणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने चर्चा करण्यासाठी सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा निश्चित करण्यासाठी मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखेचे व सर्व शिक्षण संकुलाचे संचालक व मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांची बैठक विद्यापीठात मा.प्र-कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि. ०२/०१/२०२० रोजी सकाळी ११.३० आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार सत्रारंभ व समाप्तीच्या तारखा निश्चित करण्यात येऊन अधिष्ठाता मंडळाला शिफारस करण्यात आली. सदर समितीने तारखा निश्चित केलेल्या दि.०२/०१/२०२० रोजीच्या दुपारी १.०० वा. पार पडलेल्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विचारार्थ ठेवण्यात आली असता, ठराव क्र.०२ नुसार सर्वानुमते शिफारस करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३(१) नुसार (प) मध्ये “सर्व विद्याविषयक बाबी संबंधात विद्यापीठाला सल्ला देणे आणि अधिसभेने तिच्या मागील वार्षिक बैठकीत शिफारस केलेल्या विद्याविषयक अध्ययन क्रमांबाबत व्यवहार्यता अहवाल व्यवस्थापन परिषदेला सादर करणे” अशी तरतूद आहे.

उक्त तरतुदीस अनुसरुन वरीलप्रमाणे समितीने तयार केलेल्या तारखा अधिष्ठाता मंडळासमोर विचारार्थ ठेऊन त्यास अधिष्ठाता मंडळाने विद्या परिषदेस शिफारस करुन तदनंतर विद्या परिषदेने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेस्तव सादर करुन व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेअंती सर्व संबंधितांना कळविणे आवश्यक आहे. ही बाब विचारात घेता, अधिष्ठाता मंडळानी तारख निश्चित केलेल्या आहेत. सदरच्या बैठकीमध्ये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करुन विद्या परिषदेस शिफारस केलेल्या आहेत

अ क्र	विद्याशाखा	प्रथम सत्र			द्वितीय सत्र	
		प्रारंभ	समाप्ती		प्रारंभ	समाप्ती
१)	कला, वाणिज्य, विज्ञान, सामाजिकशास्त्रे (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठातील शैक्षणिक संकुले)	२२ जून, २०२०	०३ नोव्हेंबर, २०२०		२३ नोव्हेंबर, २०२०	०१ मे, २०२१
२)	विधी (पदवी व पदव्युत्तर)	२२ जून, २०२०	०३ नोव्हेंबर, २०२०		२३ नोव्हेंबर, २०२०	०१ मे, २०२१
३)	शिक्षणशास्त्र (बी.एड, बी.पीएड, एम.एम., एम.पीएड, एम.ए. एज्युकेशन इ. पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये)	२२ जून, २०२०	३ नोव्हेंबर, २०२०		२३ नोव्हेंबर, २०२०	०१ मे, २०२१
४)	अभियांत्रिकी, तांत्रिक, आर्किटेक्चर, फार्मसी, व्यवस्थापन अभ्यासक्रम, एम.बी.ए., एम.एस.डब्लु. इ. (पदवी व पदव्युत्तर संलग्नित महाविद्यालये)	०१ जुलै, २०२०	३० नोव्हेंबर, २०२०		०१ जानेवारी, २०२१	२२ मे, २०२१
टीप: सत्रारंभ व सत्रसमाप्तीच्या तारखांमध्ये महाविद्यालयास बदल करता येणार नाही.						
सत्रारंभाच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुट्टी किंवा सार्वजनिक सुट्टी येत असल्यास त्याच्या दुसऱ्या दिवशी सत्रारंभास सुरुवात करावी. सत्र समाप्तीच्या दिवशी महाविद्यालयाची साप्ताहिक सुट्टी किंवा सार्वजनिक सुट्टी येत असल्यास त्याच्या अगोदरचा दिवस सत्र समाप्तीचा दिवस राहील.						

उक्त तरतूदीस अनुसरुन संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुले यांचेकरीता शैक्षणिक वर्ष २०२०-२१ च्या सत्र आरंभ व सत्र समाप्तीच्या तारखांना प्रथम विद्या परिषदेची मान्यता घेऊन व्यवस्थापन परिषदेसमोर सदरच्या तारखा मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे. तथापि, प्रस्तुत विद्यापीठाकडील विद्या परिषदेची बैठक दि.२६/११/२०१९ रोजी पार पडलेली आहे. तसेच दरम्यानच्या कालावधीमध्ये विद्या परिषदेची बैठक आयोजित केलेली नाही. त्यास्तव मा. कुलगुरु महोदय यांची महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) मधील तरतूदीनुसार विद्या परिषदेच्या वतीने मान्यता दिलेली आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२०-२१ करीता विद्यापीठातील सर्व संकुल व संलग्नित सर्व महाविद्यालयाकरिता सत्र आरंभ व समाप्तीच्या तारखांना व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्याची बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदय यांनी दिलेली मान्यता माहितीस्तव).

ठराव:	**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली. तसेच लॉकडाऊनच्या कालावधीमुळे उन्हाळी सुट्टीच्या कालावधीमध्ये आवश्यक बदल करुन नवीन परिपत्रक काढावे असे ठरले.**

[०३] **Rules for Ph.D. Programme (2019-20) मधील R.Ph.D. DRC and CRC 6.1 to 6.5 मधील [सद्य:स्थितीत असलेला नियम (old)] नियम खाली दर्शविल्याप्रमाणे [दुरुस्त करावयाचा नियम (new)] दुरुस्ती केलेली बाब माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठाची पेट - ७ ही पूर्व परीक्षा माहे, जून २०१९ मध्ये संपन्न झाली आहे. त्याअनुषंगाने, उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षा घेण्याची तयारी दि.२६/११/२०२१९ पासून करण्यात आलेली आहे. सदरच्या DRC/CRC च्या मौखिक परीक्षेसाठी मा.कुलगुरु व मा.प्र-कुलगुरु महोदयांनी सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे Rules for Ph.D. Programme (2019-20) मधील R.Ph.D. DRC and CRC 6.1 to 6.5 मधील नियमानुसार नामनिर्देशन केलेले आहेत. त्याप्रमाणे संबंधित विषयांचे अध्यक्ष तथा सदस्यांना पत्राद्वारे कळवून त्यांच्याकडून मौखिक परीक्षेकरीता तारीख घेऊन पीएच.डी. ची मौखिक परीक्षेचे आयोजन करण्यात आले/झाले आहे. परंतू, काही तांत्रिक कारणास्तव खालील नियमामध्ये बदल करावयाचा आहे. (सद्य:स्थितीत असलेला नियम)

Ph.D. Rules 6.1. to 6.5. (old) (सद्य:स्थितीत असलेला नियम)

6. R.Ph.D. Departmental Research Committee (DRC) and Central Research Committee (CRC)

6.1. Below is the constitution of Departmental Research Committee (DRC) for the admission to M.Phil. / Ph.D. Programme in University Department.

i. Chairperson – Head of the Department
ii. Members – Two Subject Experts (one form Department Concerned and one from outside university jurisdiction nominated by the Pro-Vice Chancellor.
iii. Member – Two nominees of the Pro-Vice Chancellor (One General and one Reservation)
iv. Member – Chairman of Board of Studies concerned

All the above members shall be the research Guides / Supervisors for Ph.D. and one of them shall be from reserved category and one may be a Female member. It is responsibility of the member from the reserved category to observe and ensure the execution of the reservation policy of Government of Maharashtra at the time of admission process.

If DRC cannot be constituted as above, due to the small size of the Department, then the recognized research Guides / Supervisors from the affiliated colleges / recognized institute may be nominated by the Pro-Vice Chancellor for the formation of DRC.

6.2. For admission to M.Phil. / Ph.D. Programme in the subjects for which University Department does not exist. The Central Researh Committee (CRC) will be constituted by the Pro-Vice Chancellor as below:

i. Chairperson – Senior Professor
ii. Members – Two Subject Experts to be nominated by the Pro-Vice Chancellor.
iii. Member – Chairperson, Board of Studies in the concerned subject.

All the above members necessarily shall be the research Guides / Supervisors

for Ph.D. and one of them should be from reserved category and one must be a woman member. It is responsibility of the member from the reserved category to observe and ensure the execution of the reservation policy of Government of Maharashtra during admission process.

6.3. The Quorum for DRC/CRC meeting will be three.

6.4. The tenure of the DRC/CRC will be of five academic years.

6.5. The approval to the formation of the DRC/CRC shall be obtained from the Pro-Vice Chancellor.

Ph.D. Rules 6.1. to 6.4. (new) (दुरुस्त करावयाचा नियम)

6. R.Ph.D. Departmental Research Committee (DRC) and Central Research Committee (CRC)

6.1. Below is the constitution of Departmental Research Committee (DRC) for the admission to Ph.D. Programme in University Department.

i. Chairperson – Head of the Department
ii. Members – Two Subject Experts (one form Department Concerned and one form outside university jurisdiction nominated by the Pro-Vice Chancellor).
iii. Member – Two nominees of the Pro-Vice Chancellor (One General and one Reservation)
iv. Member – Chairman of Board of Studies concerned

All the above members shall be the research Guides / Supervisors for Ph.D. At least one student should be awarded Ph.D. degree under his supervision and one of them shall be from reserved category and one may be a Female member. It is responsibility of the member from the reserved category to observe and ensure the execution of the reservation policy of Government of Maharashtra at the time admission process.

6.2. For admission to Ph.D. Programme in the subjects for which University Department does not exist. The Central Researh Committee (CRC) will be constituted by the Pro-Vice Chancellor as below:

i. Chairperson – Senior Professor
ii. Members – Two Subject Experts to be nominated by the Pro-Vice Chancellor.
iii. Member – Chairperson, Board of Studies in the concerned subject.

All the above members shall be the research Guides / Supervisors for Ph. D. at least one student should be awarded Ph. D. degree under his supervision and one of them shall be from reserved category and one may be a female member. It is responsibility of the member from the reserved category to observe and ensure the execution of the reservation policy of Government of Maharashtra at the time of admission process. All the above members necessarily shall be from the jurisdiction of PAH Solapur University, if a teacher from PAH Solapur University is not available then outside university teacher can be considered for the CRC committee. The Quorum for DRC / CRC meeting will be three.

6.3. The tenure of the DRC/CRC will be of five academic years.

6.4. The approval to the formation of the DRC/CRC shall be obtained from the Pro-Vice Chancellor.

सबब, वरील बाब विचारात घेता, R.Ph.D. ६.१ to ६.५ (सद्य:स्थितीत असलेला नियम) मधील नियम दुरुस्तीसाठी विद्या परिषदेच्या बैठकीसमोर ठेवणे आवश्यक / गरजेचे आहे. तथापि, नजिकच्या काळात विद्या परिषदेच्या बैठकीचे आयोजन नसल्याने मा.कुलगुरु महोदयाच्या अधिकारातील महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील १२(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने दिलेली मान्यता माहितीस्तव).

ठराव:	**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

[०४] **विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र क्र. No. F.२२-१/२०१७ (AC), दि.२९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२८-२९ या दहा वर्षाकरिता स्वायत्तता दर्जा प्रदान केल्याची बाब विद्यापीठास कळवून सदर बाबत योग्य ती अधिसूचना / आदेश विद्यापीठाने निर्गमित करण्याबाबत केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदयांनी विद्या परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: दि.०२ फेब्रुवारी, २०१९ रोजीच्या पत्र क्र.SC/१८-१९/९७७ अन्वये संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर यांचा स्वायत्तता मिळण्याबाबतचा प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाला होता.

सदर प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२२(१) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीवरुन विद्या परिषदेच्या बैठकीत सादर करुन विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे आवश्यक होते. परंतू, नजिकच्या काळात विद्या परिषद बैठकीचे प्रयोजन नसल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांची मान्यता घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगास प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

सदर प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२२ (१) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीवरुन सादर करुन विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविणे आवश्यक होते.

उपरोक्त प्रस्तावास अनुसरुन विद्यापीठ अनुदान आयोगाने दि.२६ सप्टेंबर, २०१९ रोजीचे पत्र क्र.No.F.२२-१/२०१७ (AC) अन्वये संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२८-२९ या दहा वर्षाकरिता स्वायत्तता दर्जा प्रदान केला आहे व याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने योग्य ती अधिसूचना / आदेश निर्गमित करण्याबाबत विद्यापीठास सूचित केले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२२(१) मध्ये महाविद्यालयास स्वायत्तता दर्जा प्रदान करण्याबाबत खालीलप्रमाणे तरतूद आहे.

कलम १२२(१)- स्वायत्त दजा मिळविण्यासाठी, विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था, संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त परिसंस्था यांना विद्यापीठाकडे अर्ज करता येईल. व्यवस्थापन परिषदेस, विद्या परिषदेच्या शिफारशी वरुन स्वायत्त दर्जा प्रदान करता येईल.

सदरचा प्रस्ताव विद्या परिषदेच्या शिफारशीने व व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेने विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्याची प्रक्रिया आहे. परंतू, दरम्यानच्या काळात विद्या परिषदेची बैठक नव्हती व व्यवस्थापन परिषदेची बैठक दि.११/०३/२०१९ रोजी झाली. त्यामुळे मा.कुलगुरु महोदयांच्या अधिपत्याखाली महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२(७) अन्वये विद्या परिषदेच्या वतीने सदरील प्रस्तावाची शिफारस व्यवस्थापन परिषदेस करण्यात आली आहे.

सबब, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२८-२९ या दहा वर्षाकरिता स्वायत्तता दर्जा देण्याबाबतची अधिसूचना / आदेश निर्गमित करण्याबाबत मा.कुलगुरु महोदयांची विद्या परिषदेच्या वतीने शिफारस केल्याची बाब माहितीस्तव).

ठराव:	विद्यापीठ अनुदान आयोगाने पत्र क्र. No. F.२२-१/२०१७ (AC), दि.२९ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास शैक्षणिक वर्ष २०१९-२० ते २०२८-२९ या दहा वर्षाकरिता स्वायत्तता दर्जा प्रदान केल्याची बाब विद्यापीठास कळवून सदर बाबत योग्य ती अधिसूचना / आदेश विद्यापीठाने निर्गमित करण्याबाबत केलेल्या सूचनेच्या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदयांनी विद्या परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.

[०५] प्रस्तुत विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांचे अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून शासन निर्णय क्र. अध्यास२०१९/प्र.क्र.९७/विशि-२, दि.१८/०९/२०१९ अन्वये मान्यता प्राप्त झाल्याची बाब माहितीस्तव.

(टिपणी: मा. नितिन क्षिरसागर, कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी दि. २० जुलै, २०१९ रोजीच्या पत्रान्वये संस्थापक तथा राष्ट्रीय अध्यक्ष, शिवा अखिल भारतीय वीरशैव युवक संघटना, औरंगाबाद यांचे दि. ११/०६/२०१९ रोजीचे महात्मा बसवेश्वर यांचे अध्यासन केंद्र स्थापन करण्याबाबत विनंती केल्याचे पत्र सोबत जोडून सोलापूर विद्यापीठामध्ये महात्मा बसवेश्वर यांच्या जीवन कार्यावर संशोधन व प्रबोधन करत त्यांच्या कार्यावर प्रचार व प्रसार करण्यासाठी महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र स्थापन करण्याबाबत आवश्यक असणारी इमारत, साहित्य व त्यासाठी आवश्यक असणारा आवर्ती व अनावर्ती खर्चाबाबतचा सविस्तर अहवाल शासनास त्वरित सादर करण्याबाबत प्रस्तुत विद्यापीठास सूचित केले होते. यानुषंगाने विद्यापीठाने जा.क्र. पुअहोसोविसो/आस्था/शिक्षक/२०१९/५७०९, दि. २४/०७/२०१९ अन्वये अध्यासन केंद्राचा प्रस्ताव तयार करुन शासनास सादर केला होता. या प्रस्तावाच्या अनुषंगाने दि. २६/०७/२०१९ रोजीच्या पत्रान्वये महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याचा लेखाजोखा व संक्षिप्त माहिती शासनास पाठविण्यात आली होती.

विद्यापीठाच्या सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने दि. २२ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तावामधील काही त्रुटींची पूर्तता करण्याबाबत कळविले होते. या पत्राच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये त्रिसदस्यीय तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या अहवालानुसार शासनाने कळविलेल्या त्रुटींची पूर्तता विद्यापीठाचे जा.क्र. पुअहोसोविसो/आस्था/२०१९/६६३८, दि. २८/०८/२०१९ अन्वये करण्यात आली होती.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने शासन निर्णय क्र. अध्यास-२०१९/प्र.क्र.९७/विशि-२, दि. १८ सप्टेंबर, २०१९ अन्वये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे शैक्षणिक वर्ष २०१९-२० या वर्षापासून महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र स्थापन करण्यास मान्यता प्रदान केली आहे. सदर शासन निर्णयामध्ये, सदर केंद्रामध्ये घ्यावयाच्या संशोधन कार्याबाबत मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे अध्यक्षतेखाली एक उपसमिती गठीत करुन या समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर अध्यासनाबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे नमूद केले आहे.

सबब, उपरोक्त बाब माहितीस्तव).

ठराव:	**प्रस्तुत विद्यापीठात महात्मा बसवेश्वर यांचे अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून शासन निर्णय क्र. अध्यास२०१९/प्र.क्र.९७/विशि-२, दि.१८/०९/२०१९ अन्वये मान्यता प्राप्त झाल्याबाबतची नोंद घेण्यात आली.**

[०६] **प्रस्तुत विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून विद्या परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी अभ्यासपूर्ण प्रस्ताव तयार करणेकामी आस्थापना शिक्षक विभागाने दि.१६/०८/२०१९ रोजी सादर केलेल्या टिपणीवर मा.कुलगुरु महोदयांनी नामनिर्देशन केल्यानुसार पाच सदस्यांची तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठका दि.०३/०९/२०१९, २०/११/२०१९ व २२/११/२०१९ रोजी विद्यापीठ कार्यालयात संपन्न झाल्या. या बैठकामध्ये सदर समितीने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचा सर्वंकष अभ्यास करुन अध्यासन प्रस्तावाचा मसूदा तयार करुन विद्यापीठास सादर केला आहे.

विद्यापीठात अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी प्रथम विद्या परिषद सभेमध्ये विषय सादर करणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३३ मध्ये विद्या परिषदेचे अधिकार व कर्तव्ये (१)(यक) खालीलप्रमाणे तरतूद विशद केलेली आहे.
कलम (१) (यक) : विभाग, महाविद्यालये, प्रशाळा, केंद्रे, उच्च शिक्षण, संशोधन व विशेषीकृत अभ्यासक्रम परिसंस्था स्थापन करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करणे.

परंतू, नजिकच्या काळात विद्या परिषदेची बैठक प्रस्तावित नसल्याकारणाने, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन केंद्राचा प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव पाठविणेकामी मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये तातडीची बाब म्हणून विद्या परिषदेच्या वतीने मान्यता प्रदान करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे.

सबब, मा.कुलगुरु महोदयांनी विद्या परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठराव:	**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

[०७] **प्रस्तुत विद्यापीठात Devi Ahilya Bai Holkar Chair-Administration व Kamala Sohonie Chair-Science हे अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या दि. ०६/१२/२०१९ रोजीच्या Public Notice ला अनुसरुन प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारिख २६/१२/२०१९ असल्याकारणाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी विद्या परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: प्रा. रजनीश जैन, सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचेकडून अध्यासनाबाबत दि.०६/१२/२०१९ रोजी प्रकाशित झालेली Public Notice आस्थापना विभागास दि. २१/१२/२०१९ रोजी प्राप्त झाली. सदर नोटीसला अनुसरुन आस्थापना विभागाने टिपणी सादर केली असता, मा. कुलगुरु महोदयांनी Devi Ahilya Bai Holkar Chair-Administration व Kamala Sohonie Chair-Science या दोन अध्यासन केंद्राचे प्रस्ताव तात्काळ तयार करुन मान्यतेकरिता विद्यापीठ अनुदान आयोगास पाठविण्याबाबत सूचित केल्यानुसार दोन्ही अध्यासन केंद्राचे प्रस्ताव तयार करणेकामी खालीलप्रमाणे स्वतंत्र तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आली होती.

Devi Ahilya Bai Holkar Chair- Administration Committee		
1)	Dr. Mahendra Kadam, Principal, Vitthalrao Shinde Arts College, Tembhurni	Chairman
2)	Dr. Shivaji Waghmode, Head of the Department of History, Bharat Mahavidyala, Jeur	Member
3)	Dr. P. N. Kolekar, Assistant Professor, School of Social Science, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur	Member
4)	Dr. G. T. Sankpal, C.B. Assistant Professor, School of Languages, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur	Member
Kamala Sohonie Chair- Science Committee		
1)	Dr. Mrs. A. S. Lawand, Assistant Professor, School of Chemical Sciences, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur	Chairman
2)	Dr. A. H. Jagtap, Medical Officer, Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur	Member
3)	Dr. Manali Kane, Nagpur	Member

सदर समितीच्या बैठका दि.२३/१२/२०१९ रोजी विद्यापीठ कार्यालयात संपन्न झाल्या. समितीने तयार करुन दिलेले दोन अध्यासन केंद्राचे प्रस्ताव विद्यापीठाचे जा.क्र. पुअहोसोविसो/आस्था/२०१९/९८४४, ९८४३, दि.२६/१२/२०१९ अन्वये विद्यापीठ अनुदान आयोगास मान्यता मिळणेस्तव पाठविण्यात आले. सदर प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारीख ही दि.२६/१२/२०१९ अशी असल्याकारणाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६

कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी आस्थापना विभागाच्या दि.२६/१२/२०१९ रोजीच्या टिपणीवर विद्या परिषदेच्या वतीने मान्यता प्रदान करुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केली आहे. सदर दोन अध्यासन केंद्राचे पाठविण्यात आलेले प्रस्ताव, विद्यापीठ अनुदान आयोगाची दि. ०६/१२/२०१९ रोजीची Public Notice व आस्थापना विभागाच्या दि.२६/१२/२०१९ रोजीच्या टिपणीची छायांकित प्रत अवलोकनार्थ सोबत जोडली आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठात Devi Ahilya Bai Holkar Chair-Administration व Kamala Sohonie Chair-Science हे अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या दि.०६/१२/२०१९ रोजीच्या Public Notice ला अनुसरुन प्रस्ताव पाठविण्याची अंतिम तारिख २६/१२/२०१९ असल्याकारणाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२ (७) अन्वये तातडीची बाब म्हणून मा. कुलगुरु महोदयांनी विद्या परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

ठराव:	**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (७) अन्वये मा. कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

[०८] प्रस्तुत विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी गठीत केलेल्या तज्ज्ञ समितीने सदर अध्यासन केंद्राचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगास पाठविण्याकरिता त्याप्रमाणे प्रस्ताव तयार करण्यास मान्यता मिळणेबाबत केलेली विनंती विचारार्थ.

(टिपणी: दि.२९/०९/२०१८ रोजीच्या अधिसभेमध्ये अधिसभा सदस्य श्री. एस. टी. सरवदे यांनी सोलापूर विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन सुरु करण्याची शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे अशी सूचना केली असता, त्यावर ठराव क्र. ७ सदरचा ठराव मांडल्यानंतर त्यास डॉ. टी. जे. फुलारी व डॉ. बी. एन. आदटराव यांनी अनुमोदन दिले. त्यानंतर सदरचा ठराव सर्वानुमते मान्य करण्यात आला, असा ठराव पारित झाला होता.

सदर ठरावाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठ परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र सुरु करण्यासाठी प्रस्ताव तयार करणेकामी मा. कुलगुरु महोदयांच्या नामनिर्देशनानुसार खालील प्रमाणे तज्ज्ञ समिती गठीत करण्यात आली आहे.

अ.क्र.	समितीचे अध्यक्ष / सदस्य यांचे नाव	समिती मधील पदनाम
१)	डॉ. जी. एस. कांबळे, प्राध्यापक तथा संचालक, सामाजिकशास्त्रे संकुल, पुअहोसोविसो.	अध्यक्ष
२)	डॉ. आर. बी. भोसले, प्राध्यापक तथा संचालक, रसायनशास्त्र संकुल, पुअहोसोविसो.	सदस्य

उपरोक्त समितीची बैठक दि. २९/०१/२०२० रोजी विद्यापीठ कार्यालयात संपन्न झाली. सदर बैठकीत समितीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर सविस्तर चर्चा करुन, यापूर्वी महाराष्ट्र शासनाकडे अनेक अध्यासन केंद्राचे प्रस्ताव मान्यतेकरिता पाठविण्यात आले आहेत. मात्र सदरचे प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असल्याकारणाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्राचा प्रस्ताव तूर्तास विद्यापीठ अनुदान आयोगास पाठविणे उचित होईल, असा अहवाल या कार्यालयास सादर केला आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी गठीत केलेल्या तज्ज्ञ समितीने सदर अध्यासन केंद्राचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगास पाठविण्याकरिता त्याप्रमाणे प्रस्ताव तयार करण्यास मान्यता मिळणेबाबत केलेली विनंती विचारार्थ).

ठराव:	**प्रस्तुत विद्यापीठात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अध्यासन केंद्र स्थापन करण्यासाठी गठीत केलेल्या तज्ज्ञ समितीने सदर अध्यासन केंद्राचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगास पाठविण्याकरिता प्रस्ताव तयार करण्यास मान्यता देण्यात आली.**

[०९] प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुलातील विविध विषयांतर्गत नियमित पूर्णवेळ शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (e) अन्वये विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा विषय तज्ज्ञांची नांवे व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याची बाब विचारार्थ.

(टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र.संकीर्ण - २०१७/प्र.क्र.१६६६-अ/१७/विशि-१, दि.०७/०८/२०१९ अन्वये विभागाच्या अधिनस्त असलेल्या १५ अकृषि विद्यापीठे, शासन मान्य अभिमत विद्यापीठांसाठी मंजूर असलेल्या एकूण पदांपैकी ८० टक्के इतक्या मर्यादेत पद भरती करण्यास मंजूरी दिलेली असून, त्यानुसार प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव सादर करावे असे सूचित केले आहे. त्यानुसार प्रस्तुत विद्यापीठातील ०७ शिक्षकीय रिक्त पदे भरण्यासाठी प्रस्ताव शासनास मान्यतेस्तव पाठविण्यात आलेला आहे.

सदर निवड प्रक्रिया राबविण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (e) अन्वये निवड समितीमध्ये संबंधित विषयातील तज्ज्ञ असणे आवश्यक आहे.
महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (e) -
"ज्या विषयासाठी अध्यापकाची निवड करावयाची असेल अशा विषयाचे विशेष ज्ञान असलेल्या, विद्या परिषदेने शिफारस केलेल्या विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा तज्ज्ञांच्या नामिकेतून व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित केलेले तीनपेक्षा अधिक नसतील इतके तज्ज्ञ"

उपरोक्त तरतुदीनुसार खालील तक्त्यात नमूद विषयांसाठी विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या संबंधित विषयाचे ज्ञान असलेल्या विषय तज्ज्ञांची नावे संबंधित विद्याशाखेचे अधिष्ठाता यांचेकडून मागविण्यात आलेली आहेत.

Sr. No.	Name of Subject
1.	Rural Development
2.	Mathematical Economics / Economics
3.	A.I.H.C.& A.

सबब, प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुलातील विविध विषयांतर्गत नियमित पूर्णवेळ शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (e) अन्वये विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा विषय तज्ज्ञांची नांवे व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्याची बाब विचारार्थ).

ठराव:	**प्रस्तुत विद्यापीठ परिसर संकुलातील विविध विषयांतर्गत नियमित पूर्णवेळ शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०२ (e) अन्वये विद्यापीठाशी संबंधित नसलेल्या सहापेक्षा अधिक नसतील अशा विषय तज्ज्ञांची नांवे व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यास मान्यता देण्यात आली.**

[१०] **दि. २६/११/२०१९ रोजी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.६०(५) रद्द करुन पीएच.डी. विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षेनंतरचे Declaration of Result प्रचलित पध्दतीप्रमाणे म्हणजेच, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या स्वाक्षरीने देण्याची बाब पुनश्च: विचारार्थ.**

(टिपणी: दि.२६/११/२०१९ रोजी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.६०(५) अन्वये "पीएच.डी. विद्यार्थ्यांच्या प्रवेशापासून ते मौखिक परीक्षेपर्यंतची सर्व कार्यवाही संशोधन विभागाकडून केली जात असल्याने पीएच.डी. विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षेनंतरचे Declaration of Result हे परीक्षा व मूल्यमापन मंडळ या विभागाकडून देण्याऐवजी संशोधन विभागाकडून देण्याबाबत मान्यता देण्यात आली" असा ठराव पारित झालेला आहे.

दि.१३/१२/२०१९ रोजीच्या टिपणीन्वये वरील ठरावाप्रमाणे पीएच.डी. विद्यार्थ्यांना मौखिक परीक्षेनंतर Declaration of Result हे संशोधन विभागातील कार्यरत असलेले सहा.कुलसचिव / उपकुलसचिव यांच्या स्वाक्षरीने देण्याची बाब आदेशार्थ सादर केली असता, मा.कुलगुरु महोदयांनी उपरोक्त बाब अमान्य केले आहे व Declaration of Result वर स्वाक्षरी करण्याचे काम संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांना देण्यात यावे असे आदेश दिलेले आहेत.

सबब, मा.कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये Declaration of Result देणेकरीता प्रचलित पध्दतीप्रमाणे मूळ प्रस्ताव परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्याकडे पाठवून त्यांच्याकडून Declaration of Result संबंधित पीएच.डी. विद्यार्थ्यांना देण्यात यावे.

वरील बाब विचारात घेता, दि.२६/११/२०१९ रोजी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.६०(५) रद्द करुन पीएच.डी. विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षेनंतरचे Declaration of Result प्रचलित पध्दतीप्रमाणे म्हणजेच मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या स्वाक्षरीने देण्याची बाब पुनश्च: विचारार्थ).

ठराव:	**दि. २६/११/२०१९ रोजी झालेल्या विद्या परिषदेच्या बैठकीमध्ये ठराव क्र.६०(५) रद्द करुन पीएच.डी. विद्यार्थ्यांची मौखिक परीक्षेनंतरचे Declaration of Result प्रचलित पध्दतीप्रमाणे म्हणजेच, मा.संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्या स्वाक्षरीने देण्यास मान्यता देण्यात आली.**

[११] श्री. ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्याकरिता प्राप्त झालेला प्रस्ताव विचारार्थ.

(टिपणी: श्री. ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.१९/०१/२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषि विद्यापीठाने त्यांच्या अखत्यारितील उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयाने / संस्था / विद्यापीठ विभाग यांना स्वायत्तता देण्याबाबत कार्यवाही करण्यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केले आहे. सदरील शासन निर्णयात खालीलप्रमाणे मुद्दे नमूद केले आहेत.

१) विद्यापीठांनी त्यांच्या अखत्यारित कार्यरत असणाऱ्या व उत्कृष्ट उच्च शैक्षणिक सेवा देणाऱ्या १०% महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभाग यांना स्वायत्तता देण्याबाबत कार्यवाही करावी.

२) विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील जी महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभागास स्वायत्तता (Autonomy) प्रदान करण्याच्या दृष्टीने सक्षम आहेत, अशा महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभागांना उद्युक्त करुन त्या शिक्षण संस्थांचे प्रस्ताव विद्यापीठ स्तरावरुन सर्व निकषांची तपासणी करुन विद्यापीठ प्राधिकरणाच्या मान्यतेने आवश्यक ते प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावे.

३) महाविद्यालयांना स्वायत्तता देण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार विद्यापीठांनी त्यांचे परिनियम अद्ययावत केले नसल्यास सदर परिनियम विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार प्रथम विद्यापीठांचे परिनियम अद्ययावत करण्याबाबतची कार्यवाही करावी.

४) विद्यापीठांनी त्यांच्या अखत्यारितील उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभाग यांना स्वायत्तता देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.राज्यपाल तथा कुलपती यांना सादर करावा.

तसेच दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाने दि.२३/०२/२०१७ रोजीच्या

राजपत्रान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा कायदा दि.०१/०३/२०१७ पासून अंमलात आणला असून त्यातील कलम १२२(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"स्वायत्तता दर्जा मिळविण्यासाठी, विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था, संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त संस्था यांना विद्यापीठाकडे अर्ज करता येईल. विद्या परिषदेच्या शिफारशीवरुन व्यवस्थापन परिषदेस, शिफारशीस स्वायत्तता दर्जा प्रदान करता येईल".

सबब, उपरोल्लेखित महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२२(१) मधील तरतुद विचारात घेता, श्री. ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचालित, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्याकरिता प्राप्त झालेला प्रस्ताव विचारार्थ).

ठराव:	**श्री. ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित, वालचंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्याकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली.**

[१२] **श्री. ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्याकरिता प्राप्त झालेला प्रस्ताव विचारार्थ.**

(टिपणी: श्री. ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.

महाराष्ट्र शासनाने दि.१९/०१/२०१३ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील अकृषि विद्यापीठाने त्यांच्या अखत्यारितील उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयाने / संस्था / विद्यापीठ विभाग यांना स्वायत्तता देण्याबाबत कार्यवाही करण्यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केले आहे. सदरील शासन निर्णयात खालीलप्रमाणे मुद्दे नमूद केले आहेत.

१) विद्यापीठांनी त्यांच्या अखत्यारित कार्यरत असणाऱ्या व उत्कृष्ट उच्च शैक्षणिक सेवा देणाऱ्या १०% महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभाग यांना स्वायत्तता देण्याबाबत कार्यवाही करावी.

२) विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील जी महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभागास स्वायत्तता (Autonomy) प्रदान करण्याच्या दृष्टीने सक्षम आहेत, अशा महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभागांना उद्युक्त करुन त्या शिक्षण संस्थांचे प्रस्ताव विद्यापीठ स्तरावरुन सर्व निकषांची तपासणी करुन विद्यापीठ प्राधिकरणाच्या मान्यतेने आवश्यक ते प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करावे.

३) महाविद्यालयांना स्वायत्तता देण्यासंदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार विद्यापीठांनी त्यांचे परिनियम अद्ययावत केले नसल्यास सदर परिनियम विद्यापीठ अनुदान आयोगाने दिलेल्या सूचनांनुसार प्रथम विद्यापीठांचे परिनियम अद्ययावत करण्याबाबतची कार्यवाही करावी.

४) विद्यापीठांनी त्यांच्या अखत्यारितील उच्च शिक्षण देणाऱ्या महाविद्यालये / संस्था / विद्यापीठ विभाग यांना स्वायत्तता देण्याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल मा.राज्यपाल तथा कुलपती यांना सादर करावा.

तसेच दरम्यानच्या कालावधीत महाराष्ट्र शासनाने दि.२३/०२/२०१७ रोजीच्या

राजपत्रान्वये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ हा कायदा दि.०१/०३/२०१७ पासून अंमलात आणला असून त्यातील कलम १२२(१) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"स्वायत्तता दर्जा मिळविण्यासाठी, विद्यापीठ विभाग किंवा परिसंस्था, संलग्न महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त संस्था यांना विद्यापीठाकडे अर्ज करता येईल. विद्या परिषदेच्या शिफारशीवरुन व्यवस्थापन परिषदेस, शिफारशीस स्वायत्तता दर्जा प्रदान करता येईल".

सबब, उपरोल्लेखित महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२२(१) मधील तरतुद विचारात घेता, श्री. ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचालित, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दजा मिळण्याकरिता प्राप्त झालेला प्रस्ताव विचारार्थ).

ठराव:	**श्री. ऐलक पन्नालाल दिगंबर जैन पाठशाळा संचलित, हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून स्वायत्त दर्जा मिळण्याकरिता प्राप्त झालेल्या प्रस्तावाची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करण्यात आली.**

[१३] सोलापूर सोशल असोसिएशनचे, कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बी. एड. भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणाची बाब विचारार्थ.

(टिपणी: सोलापूर सोशल असोसिएशनचे, कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बी. एड. भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणा करिता प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१) डॉ. एस. बी. क्षिरसागर (अध्यक्ष)

२) डॉ. श्रीमती ए. एम. रंगरेज (सदस्य)

३) मा. शिक्षण संचालक, (उ. शि.), पुणे (सदस्य)

४) श्री. आर. आर. बडेगर (सदस्य)

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून, समितीने बी. एड. भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ या दोन वर्षा करिता शिफारस केलेली आहे.

स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटी पुर्तता करण्याबाबत महाविद्यालयास पत्रान्वये कळविले होते. त्या अनुषंगाने महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला अटीपूर्तता अहवाल सोबत जोडला आहे.

सबब, सोलापूर सोशल असोसिएशनचे, कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयाच्या बी. एड. भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ या दोन वर्षा करिता मान्यता देण्याची बाब विचारार्थ).

ठराव:	**सोलापूर सोशल असोसिएशनचे, कॉलेज ऑफ एज्युकेशन, सोलापूर या महाविद्यालयाच्या बी. एड. भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०१९-२० व २०२०-२१ या दोन वर्षाकरिता मान्यता देण्यात आली.**

[१४] कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, बुधवार पेठ, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून बी. आर्किटेक्चर भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण व भाग ३ च्या नैसर्गिक विस्ताराची बाब विचारार्थ.

(टिपणी: कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, बुधवार पेठ, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून बी. आर्किटेक्चर भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण व भाग ३ च्या नैसर्गिक विस्तारा करिता प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी खालील प्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१) प्रा. पी. आर. पाटील (अध्यक्ष)

२) श्रीमती ए. एन. काटगांवकर (सदस्य)

३) मा.संचालक, (तंत्र शिक्षण) (सदस्य)

४) श्री. सी. जी. कोनापूरे (सदस्य)

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून, समितीने शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून बी. आर्किटेक्चर भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण व भाग ३ च्या नैसर्गिक विस्तारास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या एक वर्षा करिता अटी पूर्ततेच्या अधीन राहून शिफारस केलेली आहे.

स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटी पुर्तता करण्याबाबत महाविद्यालयास पत्रान्वये कळविले होते. त्या अनुषंगाने महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला अटीपूर्तता अहवाल सोबत जोडला आहे.

सबब, कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, बुधवार पेठ, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून बी. आर्किटेक्चर भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण व भाग ३ च्या नैसर्गिक विस्तारास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या एक वर्षा करिता मान्यता देण्याची बाब विचारार्थ).

ठराव:	**कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, बुधवार पेठ, सोलापूर या महाविद्यालयाच्या बी. आर्किटेक्चर भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण व भाग ३ च्या नैसर्गिक विस्तारास शैक्षणिक वर्ष २०२०-२१ या एका वर्षाकरिता मान्यता देण्यात आली.**

[१५] व्हि. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अँड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणाची बाब विचारार्थ.

(टिपणी: व्हि. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अँड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणा करिता प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी खालीलप्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१) प्राचार्य डॉ. पी. आर. थोरात (अध्यक्ष)

२) प्रा. डॉ. के. आर. राव (सदस्य)

३) मा. शिक्षण संचालक, (उ. शि.), पुणे (सदस्य)

४) प्रा. जी. सी. जवळकर (सदस्य)

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून, समितीने बी. एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या तीन वर्षा करिता शिफारस केलेली आहे.

स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटी पुर्तता करण्याबाबत महाविद्यालयास पत्रान्वये कळविले होते. त्या अनुषंगाने महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला अटीपूर्तता अहवाल सोबत जोडला आहे.

सबब, व्हि. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अँड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या तीन वर्षा करिता मान्यता देण्याची बाब विचारार्थ).

ठराव:	**व्हि. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स अँड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या बी.एस्सी. (बायोटेक्नॉलॉजी) भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या तीन वर्षाकरिता मान्यता देण्यात आली.**

[१६] डि. ए. व्हि. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणाची बाब विचारार्थ.

(टिपणी: डि. ए. व्हि. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणा करिता प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी खालील प्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१)	प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे	(अध्यक्ष)
२)	डॉ. आर. एस. मेंते	(सदस्य)
३)	मा. शिक्षण संचालक, (उ. शि.), पुणे	(सदस्य)
४)	डॉ. सी. जी. कोनापूरे	(सदस्य)

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून, समितीने बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०१९-२० या एका वर्षा करिता शिफारस केलेली आहे.

स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटी पुर्तता करण्याबाबत महाविद्यालयास पत्रान्वये कळविले होते. त्या अनुषंगाने महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला अटीपूर्तता अहवाल सोबत जोडला आहे.

सबब, डि. ए. व्हि. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरण शैक्षणिक वर्ष २०१९-२० या एका वर्षा करिता मान्यता देण्याची बाब विचारार्थ).

ठराव:	**डि. ए. व्हि. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या बी. सी. ए. भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०१९-२० या एका वर्षाकरिता मान्यता देण्यात आली.**

[१७] **डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून एम. ए. (इतिहास) भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणाची बाब विचारार्थ.**

(टिपणी: डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाकडून शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून एम. ए. (इतिहास) भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणा करिता प्राप्त प्रस्तावासंदर्भात महाविद्यालयास भेट देवून आवश्यक ती चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकामी खालील प्रमाणे स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली होती.

१)	प्राचार्य डॉ. एम. टी. बचुटे	(अध्यक्ष)
२)	डॉ. एच. एम. लोंढे	(सदस्य)
३)	मा. शिक्षण संचालक, (उ. शि.), पुणे	(सदस्य)
४)	श्री. एस. डी. जगदाळे	(सदस्य)

उक्त समिती सदस्यांनी सदर महाविद्यालयास भेट देवून अहवाल विद्यापीठाकडे सादर केलेला असून, समितीने एम. ए. (इतिहास) भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या तीन वर्षा करिता अटी पूर्ततेच्या अधीन राहून शिफारस केलेली आहे.

स्थानिक चौकशी समितीने सुचविलेल्या अटी पुर्तता करण्याबाबत महाविद्यालयास पत्रान्वये कळविले होते. त्या अनुषंगाने महाविद्यालयाकडून प्राप्त झालेला अटीपूर्तता अहवाल सोबत जोडला आहे.

सबब, डी. बी. एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या एम. ए. (इतिहास) भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या तीन वर्षा करिता मान्यता देण्याची बाब विचारार्थ).

ठराव:	**डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या एम. ए. (इतिहास) भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाच्या नुतनीकरणास शैक्षणिक वर्ष २०२०-२१, २०२१-२२ व २०२२-२३ या तीन वर्षाकरिता मान्यता देण्यात आली.**

[१८] **डी.बी.एफ. दयानंद कॉलेज ऑफ आर्टस ॲन्ड सायन्स, सोलापूर या महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून एम. ए. (इंग्रजी) भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणाचे नुतनीकरणाची बाब विचारार्थ.**

